जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४६७ दिनांक - २६/०६/२०२३**

२६ जुन जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त

**ध्यास- नशामुक्तीचा, चला संकल्प करुया.. अंमली पदार्थापासुन दुर राहुया.**

या संकल्पनेवर शालेय विद्यार्थ्यांची जागर दिंडी काढुन व पथनाटयव्दारे जनजागृती केलेबाबत ''

२६ जुन हा जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणुन विविध देशामध्ये साजरा केला जात असतो. केंद्र सरकारने सुध्दा यावर्षी २६ जुन जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन मोठया प्रमाणावर साजरा करावयाचे ठरवले असुन सन २०४७ पर्यत भारत देश हा अंमली पदार्थ मुक्त करण्याचे उद्दिष्ठ ठेवुन त्यादृष्टीने समाजामध्ये जनजागृती करण्यास सुरुवात केली आहे. त्याअनुषंगाने मा.श्री.रितेशकुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे शहरातील विविध शाळा, कॉलेज येथील विदयार्थ्यांना तसेच झोपडपट्टी रहाणारे रहिवाश्यांना **''चला संकल्प करुया.. अंमली पदार्थापासुन दुर राहुया..'' या संकल्पनेवर** अभियान राबवुन जनजागृती करणेबाबत आम्हांस सुचना दिलेल्या होत्या.

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या पार्श्वभुमीवर पुणे शहर पोलीसांकडुन ''ध्यास-नशामुक्तीचा'' हे अभियान राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आज दि.२६/०६/२०२३ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालयात सदर अभियानाचा मा. श्री.रितेशकुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे हस्ते दिपप्रज्वलन करुन शुभारंभ करण्यात आला आहे. त्यावेळी महाराष्ट्रीय मंडळाचे कटारिया हायस्कुल, दामले प्रशाला, चंद्रशेखर आगाशे शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची **''चला संकल्प करुया.. अंमली पदार्थापासुन दुर राहुया..''** या संकल्पनेवर जागर दिंडी व पथनाटयाव्दारे पोलीस आयुक्त कार्यालयापासुन, किराड चौक, ब्ल्यु नाईल चौक, इस्कॉन मंदिरापासुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, एम.जी. रोड अशा प्रकारे कॅम्प परिसरातुन रॅली काढण्यात आलेली होती. सदरच्या रॅलीमध्ये ठिकठिकाणी पथनाटयाव्दारे व्यसनमुक्तीबाबतचे सादरीकरण करुन जनजागृती केलेली आहे. तसेच जागर दिंडीव्दारे देखील चुकीच्या संगतीमुळे मुला-मुलींमध्ये केली जाणारी नशा रोखण्याकरिता व व्यसनांपासुन दुर रहाणेबाबतचे बॅनर्स, पोस्टर्स व स्पिकरव्दारे आवाहन करण्यात आलेले आहे. अश्याचप्रकारे यापुढेही पुणे शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करुन'' ध्यास-नशामुक्तीचा, चला संकल्प करुया, अंमली पदार्थापासुन दुर राहुया '' हे अभियान राबविण्यात येणार आहे.

सदरच्या कार्यक्रमाचेवेळी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेशकुमार,मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,प्रशासन.श्री.अरविंद चावरिया, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.सहा पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.सुनिल पवार, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२. श्री.सतिश गोवेकर,अंमली पदार्थ विरोधी पथकाचे श्री.विनायक गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल थोपटे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच ''महाराष्ट्रीय मंडळाचे'' कटारिया हायस्कुल, दामले प्रशाला, चंद्रशेखर आगाशे शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे शालेय व महाविद्यालयाचे एकुण ३५० विद्यार्थी, संस्थेच्या संचालिका, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच १०० नवप्रविष्ठ पोलीस अमंलदार व अंमली विरोधी पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.


CRIME BRANCH
गुन्हे शाखा


पुणे शहर पोलीस


पुणे पोलीस
पदार्थ सेवन विरोधी
दिनानिमित्त
मुक्ती दिंडी


दिनानिमित्त
व्यसन मुक्ती दिंडी